राहीनात.
18 अनी त्यासनी हाक मारीन ईचारं, “शिमोन पेत्र नावना माणुस आठे पाहुणा
शे का?”

19 पेत्र या दृष्टांतबद्दल ईचार करी राहींता तवय पवित्र आत्मा त्याले बोलना,
“दख, तिन माणसं तुले शोधी राहीनात;
20 तर ऊठीसन खाल चाल अनी शंका नही धरता त्यासनासंगे निंघी जा, कारण
मी त्यासले धाडेल शे.”
21 मंग पेत्र त्या लोकसकडे खाल उतरीन वना अनी त्यासले बोलना, “ज्याना
तुम्हीन शोध करी राहीनात, तो मीच शे; तुम्हीन का बरं आठे येल शेतस?”
22 त्या बोलनात, कर्नेल्य आधिकारींनी आमले धाडेल शे, तो धार्मिक माणुस
अनी देवनी भक्ती करनारा शे अनी सर्व यहूदी लोके त्यानाबद्दल चांगलीच साक्ष
देतस; त्याले देवदूतनी सांगेल शे की, तुमले घर बलाईसन तुमना कडतीन देवनं
वचन ऐकावं.
23 मंग पेत्रनी त्यासले मझार बलाईन त्यासना पाहुणचार करा;

अनी दुसरा दिन पेत्र त्यासनासंगे निंघना अनी यापो शहरमधला ईश्वासीसपैकी
काही जन त्यानासंगे गयात.
24 दुसरा दिन त्या कैसरिया शहरमा पोहचनात, तठे कर्नेल्य आपला सर्व
नातेवाईकसले अनी जवळना मित्रसले गोया करीसन त्यासनी वाट दखी राहींता.
25 जसं पेत्र मझार गया तसा कर्नेल्य त्याले भेटना अनी त्यानी पाया पडीन पेत्रले
नमस्कार करा.
26 पण पेत्र त्याले ऊठाडीसन बोलना, “उभा ऱ्हाय, मी माणुसच शे.”
27 मंग पेत्र त्यानासंगे बोलत बोलत मझार गया, तवय त्यानी बराच लोकसले
एकत्र जमा करेल दखं.
28 त्यानी त्यासले सांगं, “तुमले सर्वासले माहीत शे की, यहूदी माणुसले गैरयहूदी
माणससंगे संबंध ठेवणं किंवा त्यानाजोडे जाणं हाई त्यानाकरता अशुध्द शे; पण
कोणताच माणुसले अपवित्र किंवा अशुध्द म्हणानं नही अस देवनी माले दखाडेल
शे.
29 यामुये माले बलावं तवय मी काहीच ईचार नही करता ई लागनु; तर आते
मी ईचारस, तुम्हीन माले कसाकरता बलावं?”
30 तवय कर्नेल्य बोलना, “आजना तिन दिन पहिले, मी मना घर दुपारना तिन
वाजाले प्रार्थना करी राहींतु; तवय अचानक धवळाजरक कपडा घालेल एक माणुस
मनापुढे उभा राहीन बोलना,
31 ‘कर्नेल्य, तुनी प्रार्थना ऐकामा येल शे, अनी तुना दानधर्मनी आठवण देवनी
करेल शे.

32 यामुये यापो शहरमा कोणले तरी धाडीन शिमोन पेत्र नावना माणुसले बोलावं;
तो समुद्रना काठवरला शिमोन चांभार याना घर पाहुणा शे.'
33 म्हणीन मी तुमनाकडे माणससले लगेच धाडं, अनी तुम्हीन वनात हाई चांगलं
व्हयनं; तर आते प्रभुनी जे काही तुमले बोलाले सांगेल शे, ते ऐकाकरता आम्हीन
सर्व आठे देवसमोर जमेल शेतस."

## पेत्रना उपदेश

34 तवय पेत्रनी बोलाले सुरवात करीसन सांगं, "आते मी खरच समजी गऊ की
परमेश्वर कोणसंगे भेदभाव करस नही.
35 पण सर्व राष्ट्रसना लोकसमा जो कोणी त्यानं भय धरीन चालस अनी त्याना
कामे धार्मीक शेतस तो त्याले मान्य शे.
36 देवना हाऊ संदेश तुमले माहीत शे की, त्यानी येशु ख्रिस्त जो सर्वासना प्रभु
शे त्यानाद्वारा जे वचन शांतीना प्रचार करत इस्राएल लोकसकडे धाडं.
37 योहाननी बाप्तिस्मा गाजाडानंतर सर्व गालीलपाईन सुरवात व्हईसन सर्व
यहूदीयापावत घडेल गोष्टी तुमले माहीत शेतस.
38 तुमले नासोरी येशुबद्दल माहित शे की, कसा देवनी पवित्र आत्मातीन अनी
सामर्थ्यतीन त्याना अभिषेक करा; येशु चांगला कामे करत अनी सैताननी सत्ताखाल
ज्या व्हतात त्या सर्वासले बरं करत फिरना, कारण देव त्यानासंगे व्हता.
39 अनी त्यानी इस्राएल देशमा अनं यरूशलेम शहरमा जे काही करं त्या सर्व
गोष्टीसना आम्हीन साक्षीदार शेतस; त्या लोकसनी त्याले क्रुसखांबवर टांगीन मारं.
40 पण मरानंतर तिसरा दिन देवनी त्याले ऊठाडं अनी त्यानी दिसावं अस करं.
41 सर्व लोकसले नही दिसना पण ज्या साक्षीदार देवनी पहिलेच निवडी ठेयल
व्हतात त्यासले म्हणजे आमले दखायना, त्याच आम्हीन तो मरीन ऊठानंतर
त्यानासंगे खानंपिणं करं.
42 अनी त्यानी आमले आज्ञा करी की, लोकसले उपदेश करा अनं साक्ष द्या की
ज्याले देवनी जिवतसना अनं मरेलसना न्यायाधीश असा निवाडेल शे, हाऊ तोच
शे.
43 त्यानाबद्दल सर्व संदेष्टा साक्ष देतस की, त्यानावर ईश्वास ठेवणारा प्रत्येकले
त्याना नावना सामर्थ्यतीन पापसपाईन मुक्ती भेटी."

## गैरयहूदी लोकसवर पवित्र आत्मा उतरस

44 पेत्र हाई बोलीच राहींता, तवय ऐकणारा सर्वासवर पवित्र आत्मा उतरना.

45 मंग गैरयहूदी लोकसले पवित्र आत्माना बराच दान भेटनात हाई दखीसन
यापो शहरतीन पेत्रसंगे येल सर्व सुंता व्हयेल यहूदी ईश्वासु लोकसले आश्चर्य वाटनं.
46 कारण त्यासनी त्यासले बऱ्याच भाषा बोलतांना अनं देवनी स्तुती करतांना
ऐकं; तवय पेत्र बोलना,
47 "ज्यासले आमनामायक पवित्र आत्मा भेटेल शे, त्यासना पाणीघाई बाप्तिस्मा
कराकरता कोणी रोखु शकस का?"
48 मंग त्यानी त्यासले आज्ञा दिधी की, येशु ख्रिस्तना नावतीन यासले बाप्तिस्मा
घा; तवय त्यासनी त्याले आखो काही दिन थांबी जावानी ईनंती करी.

# 11

## पेत्र यरूशलेम मंडळीमा आपला कामनी माहीती देस

1 प्रेषितसनी अनी यहूदीया प्रांतमधला ईश्वासी बंधुसनी अस ऐकं की, गैरयहूदी
लोकसनी बी देवनं वचन स्विकारं.
2 मंग पेत्र यरूशलेमले गया तवय सुंता व्हयेल यहूदी ईश्वासु लोके त्यानासंगे वाद
करू लागनात की,
3 "बेसुंती गैरयहूदी लोकसना घर जाईसन तु पाहुणा म्हणीन राहीना अनी
त्यासनासंगे जेवणा!"
4 मंग पेत्रनी जसंनातस क्रमनुसार सांगाले सुरवात करी;
5 "मी यापो शहरमा प्रार्थना करी राहींतु तवय एक दृष्टांत दखा की, एक वस्तु
आकाशमाईन मोठी चादरनामायक चारी कोपरा धरीन सोडेल अशी मनासमोर
उतरनी.
6 त्याकडे मी ध्यान दिसन दखी राहींतु तवय पृथ्वीवरला पाळीव जनावरं,
जंगली जनावरं, सरपटणारा जीवजंतु अनी आकाशमधला पक्षी असा माले
दखायनात.
7 अनी मी अशी वाणी ऐकी की, 'पेत्र ऊठ, मारं अनी खाय!'
8 पण मी बोलनु, 'नको, नको प्रभु! कारण अपवित्र अनी अशुध्द अस काही
मना तोंडमा अजुन पावत जायेल नही शे.'
9 मंग दुसरींदाव आकाशमाईन अशी वाणी व्हयनी की, 'देवनी जे शुध्द करेल
शे ते तु अशुध्द मानु नको.'
10 अस तिनदाव व्हयनं, मंग सर्वकाही आकाशमा वर ओढाई गयं.

11 इतलामा ज्या घरमा आम्हीन व्हतुत त्याना दारमा कैसरिया शहरमातीन
मनाकडे धाडेल तीन माणसं उभा राहीनात.
12 तवय पवित्र आत्मानी माले सांगं की, शंका नही धरता त्यासनासंगे जा; मंग
यापो मातीन या सव ईश्वासु भाऊ बी मनासंगे वनात, अनी आम्हीन त्या कर्नेल्यना
घरमा गवुत.
13 कर्नेल्यनी आमले सांगं की, मी घरमा देवदूतले उभं दखं; तो बोलना की,
'यापो शहरमा कोणले तरी धाडीन शिमोन पेत्रले बलाई आण.
14 तो तुले असा गोष्टी सांगी की, त्यामुये तुनं अनी तुना सर्व घरदारनं उध्दार
व्हई.'
15 अनी जवय मी बोलु लागनु, जसं सुरवातले आपलावर तसा त्यासनावर बी
पवित्र आत्मा वना.
16 ✡तवय प्रभुनी सांगेल गोष्ट माले याद वनी, ती अशी की, 'योहान पाणीघाई
तुमना बाप्तिस्मा करे हाई खरं, पण तुमना बाप्तिस्मा पवित्र आत्माघाई व्हई.'
17 जवय आपण प्रभु येशु ख्रिस्तवर ईश्वास ठेवा तवय जसं आपले तसच
गैरयहूदीसले बी देवनी दान दिधं; तर मंग देवले अडवणारा असा मी कोण!"
18 हाई ऐकीसन त्या गप्पच राहीनात अनी देवनं गौरव करत बोलनात, तर मंग
देवनी गैरयहूदी लोकसले बी जिवन मिळाकरता पश्चतापनं दान देयल शे.

## अंत्युखिया शहरमाधली ख्रिस्ती मंडळी

19 ✡स्तेफनपाईन सुरू व्हयेल संकटमुये ज्या ईश्वासु लोके पांगी जायेल व्हतात
त्या फेनीके सायप्रस अनी अंत्युखिया शहरपावतना यहूदी लोकसमा देवनं वचन
मात्र सांगी राहींतात.
20 तरी त्यासनापैकी बराचजन सायप्रसी अनी कुरेनेकर गावना व्हतात, त्यासनी
अंत्युखियामा ईसन प्रभु येशुनी सुवार्ता गैरयहूदी* लोकसले बी सांगी.
21 तवय प्रभुना हात† त्यासनावर व्हता, अनी बराच लोके ईश्वास ठिसन प्रभुकडे
वळनात.
22 जवय त्यासनी बातमी यरूशलेममधल्या मंडळीसना कानवर पडनी, तवय
त्यासनी बर्णबाले अंत्युखियाले धाडं.

---

✡ **11:16** ११:१६ प्रेषित १:५ ✡ **11:19** ११:१९ प्रेषित ८:१-४ * **11:20 11:20** किंवा ग्रीक
बोलणारा यहूदी † **11:21 11:21** प्रभुना हात प्रभुनं सामर्थ्य

23 तो तठे पोहचना तवय देवनी लोकसले देयल आशिर्वाद दखीसन खूश व्हयना,
अनी त्या सर्वासले प्रोत्साहीत करू लागना की, त्यासनी पुर्ण खरा मनतीन देवसंगे
ईश्वासु ऱ्हावाले पाहिजे.
24 बर्णबा हाऊ चांगला माणुस व्हता, अनी पवित्र आत्मातीन अनं ईश्वासतीन
परीपुर्ण व्हता, अनी बराचसा लोके प्रभुजोडे वनात.
25 नंतर बर्णबा शौलना शोध कराले तार्स शहरले गया.
26 त्याना शोध लागना तवय त्यानी त्याले अंत्युखियाले आणं, मंग अस व्हयनं
की, त्यानी तठे वरीसभर मंडळीमा मिळीनमिसळीन बराच लोकसले शिकाडं. अनी
शिष्यसले "ख्रिस्ती" हाई नाव पहीलींदाव अंत्युखियामा पडनं.
27 त्या दिनसमा यरूशलेमतीन काही संदेष्टा अंत्युखियाले वनात.
28 ✡तवय त्यासनामातीन अगबस नावना माणुसनी ऊठीसन पवित्र आत्माद्वारे
सांगं की, सर्व जगमा भयंकर दुष्काळ पडावं शे. अनी क्लौदिया राजानं राज्य व्हतं
तवय असच व्हयनं.
29 तवय प्रत्येक शिष्यनी निर्णय लिधा की, यहूदीया शहरमा राहणारा ईश्वासु
बंधुसले मदत म्हणीन काहीतरी धाडानं.
30 तसं त्यासनी करं, त्यासनी बर्णबा अनी शौल यासना हाते मंडळीना वडील
लोकसकडे जे धाडता ई ते धाडं.

# 12

## पेत्रले अटक

1 त्या येळले हेरोद राजानी मंडळीमधला काही लोकसना छळ कराकरता
त्यासले अटक करी.
2 अनी योहानना भाऊ याकोब ह्याले त्यानी तलवारघाई मारी टाकं.
3 ते यहूदी लोकसले आवडनं हाई दखीसन तो पेत्रले बी धराले तयार व्हयना;
तवय बेखमीर भाकरना सणना दिन व्हतात.
4 त्यानी पेत्रले धरीन कैदखानामा टाकं, अनी चारचार सैनिकसन्या चार
तुकड्यासले रखवाली करता ठेवं; वल्हांडण सण व्हवानंतर त्याले लोकसपुढे बाहेर
आणानं असा हेरोदनी बेत करेल व्हता.
5 असा पहारामा पेत्र कैदखानामा व्हता; पण त्यानाकरता मंडळीना लोकसनी
देवजोडे मनपाईन प्रार्थना चालु व्हती.

---

✡ **11:28** ११:२८ प्रेषित २१:१०

## पेत्रनी कैदखानामातीन सुटका

6 हेरोद त्याले बाहेर लयनार व्हता त्या रातले दोन साखळदंडसघाई बांधेल पेत्र
दोन शिपाईसना मझार झोपेल व्हता अनी पहारेकरी दारपुढेच कैदखानावर ध्यान दि
राहींतात.
7 तवय दखा प्रभुना दूत त्यानाजोडे प्रकट व्हयना अनी खोलीमा उजेड पडना;
त्यानी पेत्रना खांदावर थाप मारीन त्याले जागं करीसन बोलना, “लवकर ऊठ!”
तवय त्याना हातन्या बेड्या तुटीन खाल पडन्यात.
8 मंग देवदूतनी त्याले सांगं, “कंबर बांध अनी पायजोडा घाल.” पेत्रनी तसं
करं, मंग देवदूत त्याले बोलना, “तु तुना कपडा घालीन मनामांगे ये.”
9 तो कैदखानामातीन निंघीसन त्यानामांगे चालु लागना, पण त्याले हाई समजी
नही राहींत की, जे काही देवदूत करी राहीना ते खरच शे; पण त्याले अस वाटनं
की, मी दृष्टांत दखी राहीनु.
10 नंतर पहिला अनी दुसरा पहारा वलांडीन त्या शहरमा जावाना लोखंडी
फाटकजोडे वनात, तवय तो आपोआप त्यासनाकरता उघडना; अनी त्या बाहेर
निंघीसन पुढे एक वाट चाली गयात, इतलामा देवदूत पेत्रले सोडीन निंघी गया.
11 मंग पेत्रले समजनं की काय घडनं अनी तो बोलना, “आते माले खरच कळनं
की, प्रभुनी आपला दूत धाडीसन माले हेरोद राजाना हाततीन अनी यहूदी लोके जी
वाट दखी राहींतात त्यापाईन माले सोडायेल शे.”
12 त्याले हाई समजनं तवय तो मार्क म्हणेत तो योहान, यानी माय मरीया हिना
घरजोडे वना, तठे बराच लोके एकत्र व्हईसन प्रार्थना करी राहींतात.
13 पेत्र बाहेरना दरवाजानी कडी ठोकी राहींता तवय एक दासी पोर जीनं नाव
रूदा व्हतं ती दार उघडाकरता वनी.
14 तिनी पेत्रना आवाज वळखा पण खूशीमा दरवाजा नही उघडताच पयत मझार
जाईन सांगु लागनी की, “पेत्र दरवाजाजोडे उभा राहेल शे.”
15 त्यासनी तिले सांगं, “तु येडी व्हयनी शे का!” तरी ती खात्रीतिन सांगु लागनी
की हाई खरच शे; त्या बोलनात, “तो त्याना देवदूत व्हई.”
16 मंग पेत्र ठोकतच राहीना तवय त्यासनी दरवाजा उघडा अनी त्याले दखीन
त्या थक्क व्हयनात.
17 तवय त्यानी त्यासले गप्प राहा असा हातवरी इशारा करा, अनी माले प्रभुनी
कैदखानामातीन कसं काढं हाई त्यानी त्यासले सविस्तर सांगं, अनी सांगं की, “हाई
याकोब अनी सर्व बंधुसले सांगा,” नंतर तो दुसरीकडे निंघी गया.

18 मंग दिन उगायना तवय पेत्रनं काय व्हयनं, अशी शिपाईसमा मोठी गडबड
व्हयनी.
19 हेरोदनी त्याले शोधाना आदेश दिधा, पण पेत्र सापडना नही; म्हणीसन त्यानी
पहारेकरीसनी चौकशी करीसन त्यासले मारी टाकानी आज्ञा दिधी.
मंग हेरोद यहूदीया सोडीन कैसरिया शहरमा खाल ईसन राहु लागना.

### हेरोदना मृत्यु

20 हेरोद सोर अनी सिदोन शहरना लोकसवर भलताच संतापना व्हता, म्हणीसन
त्यासनी एकमत करीसन त्यानाकडे वनात अनी राजभवनना अधिकारी ब्लस्त ह्याले
मनाडीसन राजासंगे समजोता कराना प्रयत्न करा; कारण राजाना देशमुयेच त्यासना
देशनं पालन पोषण व्हई राहींतात.
21 मंग ठरायेल दिनले हेरोद राजा राजकीय कपडा घालीसन राजासनवर बठना
अनी जमेल लोकसले भाषण देवु लागना.
22 तवय लोके वरडीन बोलु लागनात, "हाई मनुष्यवाणी नही शे, देववाणी शे."
23 तीच येळले प्रभुना दूतनी हेरोदले मारी टाकं, कारण त्यानी देवले मान दिधा
नही, त्याना आंगमा किडा पडीन तो मरना.
24 पण देवनं वचन वाढतच गयं अनी पसरत गयं.
25 बर्णबा अनी शौल ह्या आपला कामे पुरा करीसन आपलासंगे योहान ज्याले
मार्क म्हणेत त्याले लिसन यरूशलेमतीन परत माघारे अंत्युखियाले वनात.

# 13

### बर्णबा अनी शौलनी निवड

1 अंत्युखियानी मंडळीमा काही संदेष्टा अनी शिक्षक व्हतात; जसं की, बर्णबा,
शिमोन ज्याले नीगेर* म्हणेत, लूक्य कुरेनेकर, शौल अनी मनाएल ज्यानं पालन
पोषण मांडलिक हेरोद राजासंगे व्हयेल व्हतं.
2 त्या प्रभुनी सेवा अनं उपास करी राहींतात तवय पवित्र आत्मानी सांगं की,
"बर्णबा अनी शौल यासले ज्या कामकरता मी बलायेल शे, त्याकरता त्यासले अलग
करा."
3 उपास प्रार्थना व्हयनी तवय त्यासनी त्यासनावर हात ठिसन त्यासले धाडी
दिधं.

### सायप्रस बेटवर बर्णबा अनी शौल

* **13:1 13:1** नीगेर म्हणजे काळा

4 अस पवित्र आत्मानाद्वारा बर्णबा अनी शौलले धाडावर त्या सलूकीयामा ईसन
तठेन जहाजवर सायप्रस बेटवर गयात.
5 मंग त्या सलमीन शहरमा वनात तठे त्यासनी यहूदीसना सभास्थानमा देवना
वचनना प्रचार करा; त्यासना काममा योहान मार्क बी मदत करी राहींता.
6 पुढे त्या सर्व बेटसवरतीन चालीन पफोस नावना बेटवर गयात तठे त्यासले
बार-येशु नावना कोणतरी एक यहूदी जादूगर अनं खोटा संदेष्टा भेटना.
7 तो त्या बेटना अधिकारी सेरगीया पौल नावना बुध्दीमान माणुसना मित्र व्हता;
अधिकारीनी बर्णबा अनं शौल यासले बलाईसन देवनं वचन ऐकानी ईच्छा दखाडी.
8 पण अलीम† जादूगरनी त्यासना विरोध करीसन राज्यपालले बहयकाडी
राहींता कारण त्यानी ईश्वास ठेवाले नको म्हणीसन.
9 तवय शौल ज्याले पौल बी म्हणेत त्यानी पवित्र आत्मातीन परीपुर्ण व्हईसन
जादूगारकडे टक लाईन दखं.
10 अनी बोलना, "अरे सर्व कपटतीन अनं सर्व लुच्चेगिरीतीन भरेल सैतानना
पोऱ्या! तु सर्व धार्मीकताना शत्रु, तु प्रभुनी सरळ वाटले वाकडी करानं सोडावं नही
का!
11 तर दख, प्रभुना हात तुनावर पडेल शे; तु आंधया व्हशी अनी काही
काळपावत तु सूर्यप्रकाश दखाऊ नही."
तवय लगेच अंधुकपण त्याना डोयासवर पडना, तो इकडे तिकडे चाफलू लागना
की, कोणतरी त्याना हात धरीसन त्याले वाट दखाडी.
12 तवय अधिकारीनी हाई घटना दखीसन अनी प्रभुना शिक्षणवरतीन
आश्चर्यचकीत व्हईसन ईश्वास ठेवा.

## पिसिदियामधलं अंत्युखियामा पौलना उपदेश

13 मंग पौल अनं त्यानासंगेना लोके पफोस बेट वरतीन जहाजमा बठीन पंफुल्य
प्रदेशमातील पिर्गा शहरले गयात, अनी योहान मार्क त्यासले सोडीन यरूशलेमले
परत गया.
14 नंतर त्या पिर्गा आठेन निंघीसन फिरत फिरत पिसिदिया गावना अंत्युखियामा
पोहचनात, अनी शब्बाथ दिनले यहूदीसना सभास्थानमा जाईन बठनात.
15 तवय मोशेनं नियमशास्त्र अनी संदेष्टासनं पुस्तक वाचीन व्हवानंतर
सभास्थानना अधिकारीनी त्यासले निरोप दिधा की, "मित्रसवन, तुमनाकडे
लोकसकरता काही बोधवचन व्हई तर सांगा."

† **13:8 13:8** अलीम त्या जादूगरनं ग्रीक भाषामा हाई नाव शे

16 तवय पौल उभा राहीसन अनी हातघाई इशारा करीसन बोलना;
अहो, इस्राएल लोकसवन अनी देवनं भय धरणारा गैरयहूदीसवनं; ऐका!
17 या इस्राएल लोकसना देवनी आपला पुर्वजसंले निवाडी लिधं, त्या लोके
मिसर देशमा प्रवाशी व्हतात तवय त्यासले उंच करं अनी देवनी आपला मोठा
पराक्रमतीन त्यासले मिसर देशमातीन काढं.
18 पुढे जवळजवळ चाळीस वरीस ओसाड प्रदेशमा त्यानी त्यासनी वागणुक
सहन करी.
19 नंतर देवनी कनान देशमधला सात राष्ट्रसना नाश करीसन ती जमीन त्यासले
जवळजवळ साडेचारशे वरीसपावत वारीस म्हणीसन दिधी.
20 ह्या सर्व व्हवाकरता साडेचार वरीस लागनात यानानंतर त्यानी शमुवेल
संदेष्टापावत बराच न्यायाधीश नेमीन दिधात.
21 मंग त्यासनी राजा मांगा, तवय देवनी बन्यामीन वंश मधला किशाना पोऱ्या
शौल याले राजा म्हणीसन चाळीस वरीसपावत त्यासले दिधा.
22 नंतर त्यानी त्याले काढीसन त्यासना राजा दावीदले बनाडं, त्यानाबद्दल देवनी
साक्ष दिधी की; माले एक माणुस इशायना पोऱ्या दावीद भेटेल शे, तो मना मनसारखं
शे, तो मन्या सर्व ईच्छा पुऱ्या करी.
23 ह्याच दावीदना वंशमातीन देवनी वचनप्रमाणे इस्राएल लोकसकरता तारणारा
येशु ह्याले आणं.
24 ✡येशुना कामनी सुरवात व्हवाना पहिले योहाननी पुढे ईसन पापपाईन फिराना
अनी बाप्तिस्माना प्रचार सर्व इस्राएल लोकसमा करा.
25 ✡योहान आपलं कार्य पुरं करी राहींता तवय तो बोलना, तुमले काय वाटस,
मी कोण शे? मी तो नही शे, ज्यानी तुम्हीन वाट दखी राहिनात, तर दखा, ज्याना
पायमधला जोडानी दोरी सोडानी मनी लायकी नही, असा कोणी तरी मना मांगतीन
ई राहीना.
26 हे मना इस्राएली भाऊसवन, अब्राहामना वंश मधला पोऱ्यासवन, अनं
तुमनामा ज्या देवनं भय धरणारा अनी देवनी स्तुती करनारा गैरयहूदीसवनं;
आपलाकरता हाई उध्दारनी सुवार्ता धाडेल शे!
27 कारण दर शब्बाथ दिनले संदेष्टासनी लिखेल वाचामा येस त्याना एक बी
शब्द नही समजी लेता यरूशलेममा राहणारासनी अनी त्यासना अधिकारीसनी याच
येशुले नही वळखता दोषी ठराईसन संदेष्टासनी सांगेल गोष्टीसले पुरं करं.

✡ **13:24** १३:२४ मार्क १:४; लूक ३:३ ✡ **13:25** १३:२५ योहान १:२०; मत्तय ३:११; मार्क १:७; लूक ३:१६; योहान १:२७

28 ✡अनी मरणदंडकरता कोणतच कारण सापडनं नही तरी त्याना वध करा
अशी त्यासनी पिलातले मागणी करी.
29 ✡मंग त्यानाबद्दल शास्रमा लिखेल सर्व पुरं करीसन, त्यासनी त्याले
क्रुसखांबवरतीन खाल उतरीसन कबरमा ठेवं.
30 पण देवनी त्याले मरेलस मातीन जिवत करं,
31 ✡त्यानासंगे गालीलमातीन यरूशलेममा येल व्हतात त्यासले तो बराच दिन
दखायना, ह्या त्याच शेतस ज्या आते इस्राएल लोकसना समोर त्याना साक्षीदार
शेतस.
32 आपला पुर्वजसंले जे वचन देवनी देयल व्हतं, त्यानी सुवार्ता आते आम्हीन
तुमले सांगतस;
33 देवनी येशुले परत जिवत करीसन ते वचन आपला लेकरं बाळसकरता पुरं
करेल शे, दुसरा स्तोत्रमा अस लिखेल शे,

तु मना पोऱ्या शे;
आज मी तुले जन्म देयल शे,✡

34 अनी देवनी त्याले मरेलस मातीन जिवत करं कारण तो कबरमा कुजाले नको;
यामुये यानाबद्दल त्यानी म्हणेल शे की;

मी दावीदले जी प्रतिज्ञा देयल शे, त्याबद्दलना पवित्र
अनी अटल आशिर्वाद त्या तुले दिसु.✡

35 असच तो आखो एक स्तोत्रमा म्हणस,

तु आपला पवित्र माणुसले कबरमा कुजू देवावू नही✡

36 कारण दावीद देवनी ईच्छाप्रमाणे आपला पिढीना लोकसनी सेवा पुरी करीसन
मरी गया, अनी आपला पुर्वजसंना मझार बुंजाई गया अनी त्यानं शरीर कुजी गयं.
37 पण ज्याले देवनी मरनंमातीन जिवत करं तो कुजना नही.
38 यामुये मना इस्राएली भाऊसवन, हाई तुम्हीन समजी ल्या की, येशु कडतीन
पापसना क्षमानी बातमी तुमले सांगामा येल शे.
39 अनी यानाकडतीनच तुम्हीन प्रत्येक येशुवर ईश्वास करनारा त्या सर्व पापसपाईन
सुटशात पण मोशेना नियमशास्रघाई पापसपाईन सुटावुत नही.

---

✡ **13:28** १३:२८ मत्तय २७:२२,२३; मार्क १५:१३,१४; लूक २३:२१-२३; योहान १९:१५ ✡ **13:29** १३:२९ मत्तय २७:५७-६१; मार्क १५:४२-४७; लूक २३:५०-५६; योहान १९:३८-४२ ✡ **13:31** १३:३१ प्रेषित १:३ ✡ **13:33** १३:३३ स्तोत्रसंहिता २:७ ✡ **13:34** १३:३४ यशया ५५:३; स्तोत्रसंहिता ८९:३-५; २ शमुवेल ७:११–१६:१२ ✡ **13:35** १३:३५ स्तोत्रसंहिता १६:१०

40 यामुये सावधान ऱ्हा, नहीतर संदेष्टासना ग्रंथमा जे सांगेल शे ते तुमनासंगे बी घडी
जाई;
41 दखा, अहो धिक्कार करनारासवन! दखीसन आश्चर्य माना,
अनी मरी जा! कारण मी आज तुमनामा एक कार्य करी राहीनु,
ते कार्य अस की, त्यानाबद्दल तुमले कोणी सविस्तर सांगं,
तरी तुम्हीन ईश्वास धरावुत नही!
42 पौल अनी बर्णबा सभास्थान माईन बाहेर जाई राहींतात तवय लोकसनी सांगं
की, तुम्हीन पुढला शब्बाथ दिनले परत या अनी ह्या गोष्टीसबद्दल आखो सांगा.
43 मंग जवय आराधना संपनी तवय यहूदी अनी भक्तीमान यहूदी मतप्रमाणे
चालणारा बराच गैरयहूदी लोके पौल अनी बर्णबा यासना मांगे गयात; त्यासनी
त्यासनासंगे बोलीन देवनी कृपामा टिकी ऱ्हावाकरता त्यासनं मन वळावं.
44 पुढला शब्बाथ दिनले सर्वच गाव प्रभुनं वचन ऐकाले जमनं.
45 लोकसनी गर्दी दखीन यहूदी लोकसले हेवा वाटू लागना; अनी पौल जे
बोली राहींता त्याना विरोध करीसन त्या अपशब्द बोलू लागनात.
46 तवय पौल अनी बर्णबा न घाबरता बोलनात, देवनं वचन पहिले तुमले सांगनं
आवश्यक शे, पण तुम्हीन त्याले धुतकारी राहीनात अनी स्वतःले सार्वकालिक
जिवनकरता अयोग्य ठराई राहीनात, तर दखा आते आम्हीन तुमले सोडीन गैरयहूदी
लोकसकडे जातस.
47 कारण प्रभुनी आमले आज्ञा देयल शे ती हाई की;
मी तुले गैरयहूदीसकरता प्रकाश करीसन ठेयल शे,
यानाकरता की पृथ्वीना शेवटपावत तु उध्दारनं कारण व्हवाले पाहिजे.
48 हाई ऐकीसन गैरयहूदी लोके भलताच खूश व्हयनात अनी त्या देवना वचननी
वाहवाह करू लागनात अनी जितला जन सार्वकालिक जिवनकरता नेमायेल व्हतात
तितलासनी ईश्वास धरा.
49 प्रभुनं वचन त्या सर्व प्रदेशमा पसरत गया.
50 तवय यहूदी लोकसनी देवनी आराधना करनारा सुशिक्षीत गैरयहूदी बायासले
अनी गावमधला मुख्य माणससले भडकावं अनी पौल अनं बर्णबा यासले तरास
दिसन त्या प्रदेशमातीन हाकली दिधं.
51 ✡मंग शिष्यसनी आपली पायनी धुळ तठेच झटकीन इकुनियोन शहरले
गयात.

✡ **13:51** १३:५१ मत्तय १०:१४; मार्क ६:११; लूक ९:५; १०:११

52 अंत्युखियामाधला ईश्वासी आनंदतीन अनी पवित्र आत्मातीन परीपुर्ण व्हतं
गयात.

# 14

## इकुन्य शहरमा पौल अनं बर्णबा

1 मंग इकुनियो शहरमा अस व्हयनं की; पौल अनी बर्णबा यहूदी लोकसना
सभास्थानमा गयात अनी असा बोलु लागनात की, यहूदी अनी गैरयहूदी यासनी
मोठी गर्दीनी ईश्वास धरा.
2 पण ज्या यहूदी लोकसनी येशुवर ईश्वास धरा नही त्यासनी गैरयहूदी लोकसना
मनमा बंधुवर्गना विरोधमा कडूपणा निर्माण करा.
3 त्या बराच दिन तठे राहीनात अनी प्रभुबद्दल नही घाबरता बोलनात, प्रभुनी बी
आपली कृपाना सत्य वचनबद्दल साक्ष दिधी; म्हणजे त्यासनाकडतीन आश्चर्यकर्म
अनी चमत्कार व्हवु दिधात.
4 तवय शहरना लोकसमा फुट पडनी; काही जणसनी यहूदी लोकसनी अनी
काही जणसनी प्रेषितसनी बाजू धरी.
5 तवय काही गैरयहूदी अनी यहूदी लोके, अनी त्यासना अधिकारी यासनी
एकत्र ईसन ठरायं की, शिष्यसले त्रास दिसन दगडमार करानी.
6 जवय हाई बर्णबा अनी पौलले माहीत पडनं, तवय त्या लूकावनिया
प्रदेशमातील लुस्त्र अनी दर्बे या शहरसमा अनी त्याना आजुबाजूना प्रदेशमा पळी
गयात.
7 अनी तठे त्या सुवार्ता सांगत राहीनात.

## लुस्त्र अनं दर्बे शहरमा पौल अनी बर्णबा

8 तवय लुस्त्रमा कोणतरी पायसघाई पांगळा असा एक माणुस बठेल व्हता, तो
जन्मपाईन चालेलच नव्हता.
9 त्या माणुसनी पौलनं बोलनं ऐकं; पौलनी त्यानाकडे ध्यान लाईसन दखं की,
त्याले मी बरं व्हई जासु, हाऊ ईश्वास शे.
10 मंग तो मोठ्ठा आवाजमा बोलना, “तु आपला पायवर निट उभा ऱ्हाय.” तवय
तो उडी मारीन ऊठना अनी चालु लागना.
11 पौलनी करेल कृत्य दखीन लोकसनी गर्दी लूकाउनिया भाषामा जोरमा
वरडीन बोलनात, “देव माणुसना रूपमा आमनाकडे उतरेल शेतस!”

12 त्या बर्णबाले ज्युपितर म्हणु लागनात, अनी पौल मुख्य वक्ता व्हता म्हणीसन
त्याले हर्मेस म्हणु लागनात,
13 मंग ज्युपितर देवनं मंदिर गावना पुढेच व्हतं, त्याना पुजारी बैल अनी
फुलसन्या माळा दरवाजाजोडे लई वना अनी लोकसनी गर्दीसंगे तो यज्ञ करणार
व्हता.

14 हाई ऐकीसन प्रेषितसनी म्हणजे बर्णबा अनी पौलनी आपला कपडा फाडात
अनी लोकसमा घुशीन उच्चा आवाजमा बोलनात,
15 "अरे भाऊसवन, हाई का बरं करी राहीनात? आम्हीन बी तुमनामायकच
माणसे शेतस! तुम्हीन या बिनकामन्या गोष्टी सोडीसन ज्यानी आकाश, पृथ्वी, समुद्र
अनी त्यामातीन सर्व बनाडं त्या जिवत देवकडे वळा अशी सुवार्ता आम्हीन तुमले
सांगतस.
16 त्यानी जो काळ निंघी गया त्या पिढीना लोकसले ज्यासनी-त्यासनी वाटतीन
जावु दिधं.
17 तरी बी त्यानी कायम उपकारना कामसद्वारा आपलं अस्थित्वनं प्रमाण दिधं;
त्यानी तुमले आकाशमातीन पाऊस दिधा अनी ऋतु नुसार तुमले पीकं दिधात, तोच
तुमले अन्न देस अनी त्यानीच आनंदतीन तुमना मने भरी दिधात."
18 अस बोलीसन बी त्यासनी त्यासनाकरता जे यज्ञ करणार व्हतात त्यापाईन ती
गर्दीले जेमतेम आवरं.

19 नंतर पिसिदीयामाधला अंत्युखिया अनी इकुनियो गावतीन कित्येक यहूदी
लोके वनात; त्यासनी लोकसनं मन वळाईन पौलले दगडमार करा अनी तो मरी गया
अस समजीन त्याले ओढत गावबाहेर लई जाईन टाकी दिधं.
20 पण शिष्य त्याना आजुबाजू जमनात तवय तो ऊठना अनी परत गावमा गया.
दुसरा दिन तो बर्णबासंगे दर्बेस गावले गया.

## पौल अनी बर्णबा सिरियामाधला अंत्युखियाले परत येतस

21 दर्बेस शहरमा पौल अनी बर्णबानी सुवार्ता सांगीन बराच शिष्य बनाडावर
लुस्त्र, इकुनियो अनं पिसिदीयामाधला अंत्युखिया या शहरसमा त्या परत वनात.
22 अनी ईश्वासी लोकसना मन स्थिर करीसन त्यासले प्रोत्साहन दिसन सांगेत
की, "ईश्वासमा टिकी राहा; कारण आपले बराच संकटसमातीन देवना राज्यमा
जानं पडस."

23 त्यासनी त्यासनाकरता प्रत्येक मंडळीमा वडीलमंडळनी निवड करी, अनी
उपास अनं प्रार्थना करीसन, ज्या प्रभुवर त्या ईश्वास ठेयल व्हता त्यानाकडे त्यासले
सोपी दिधं.
24 मंग त्या पिसिदियामातीन पंफुल्या शहरमा गयात.
25 अनी पिर्गा आठे वचन सांगा नंतर त्या अत्तलियाले गयात.
26 तठेन त्या सिरियामाधला अंत्युखिया गावले येवाकरता नावमा बठीन
निंघनात, जे कार्य त्यासनी करं त्यानाकरता त्यासले देवनी कृपावर सोपानंतर त्या
तठेनच निंघना व्हतात.
27 अंत्युखियामा पोहचावर त्यासनी मंडळीले एकत्र बलाईन, आम्हीन देवना
सहवासमा व्हतुत तवय देवनी काय काय करं अनी गैरयहूदी लोकसकरता ईश्वासना
दारे कसा कसा उघडनात हाई सांगं.
28 मंग त्या शिष्यससंगे बराच काळ राहीनात.

# 15

## यरूशलेममाधली सभा

1 तवय कितलातरी लोकसनी यहूदीया मातीन अंत्युखिया शहरतीन उतरीन
ईश्वासु बंधुजनसले अशी शिकवण दिधी की, मोशेना नियमशास्त्रप्रमाणे सुंता
व्हवाशिवाय तुमनं तारण व्हणं शक्य नही.
2 तवय हाई बात वरतीन पौल अनी बर्णबा यासना त्यासनासंगे बराच मतभेद अनी
वादविवाद व्हयना त्यानानंतर अस ठरावामा वनं की, पौल अनी बर्णबा यासनी अनी
त्यासनामातीन बराच जणसनी या वादबद्दल यरूशलेम मातील प्रेषित अनं वडीलवर्ग
यासनाकडे जावानं.
3 मंग मंडळीनी त्यासले निरोप दिधा; तवय त्या फेनीके अनं शोमरोन या
गावसमातीन गयात अनी त्या गावसमा गैरयहूदी लोके देवकडे कसे वळनात अस
सविस्तर बातमी सांगीन त्यासनी सर्व ईश्वासु लोकसले भलतच खूश करं.
4 नंतर त्या यरूशलेमले पोहचावर तठली मंडळी, प्रेषित अनी वडीलवर्ग यासनी
त्यासना सत्कार करा; तवय देवनी त्यासनाकडतीन जे जे करी लिधं ते त्यासनी
सांगं.
5 पण परूशी लोकसना पंथमातील बराच ईश्वास ठेवणारा उभा राहिसन बोलनात,
“गैरयहूदीसनी सुंता व्हवालेच पाहिजे अनी मोशेना नियमशास्त्र पाळाले त्यासले
आज्ञा कराले पाहिजे.”
6 मंग प्रेषित अनी वडीलवर्ग या गोष्टीसबद्दल ईचार कराले जमनात.

7 ✡तवय बराच वादविवाद व्हवानंतर, पेत्र उभा राहीसन त्यासले बोलना,
“भाऊसवन तुमले माहीत शे की, मना तोंडतीन गैरयहूदी लोकसनी सुवार्तानां संदेश
ऐकीसन ईश्वास धराले पाहिजे म्हणीसन सुरवातना दिनसपाईन तुमनामा देवनी माले
निवाडेल शे;
8 ✡अनी देव सर्वासना मनले वळखस त्या देवनी जसं आपले तसा त्यासले बी
पवित्र आत्मा दिसन त्यासनाबद्दल साक्ष दिधी.
9 त्यासना ईश्वासमुये त्यासना पापसनी क्षमा करा अनी आमनामा कोणताच भेद
ठेवा नही.
10 अस शे तरी बी जे वझं, आपला पुर्वज अनी आपण बी वाहवाकरता समर्थ
नव्हतुत ते ईश्वासीसना मानवर ठिसन तुम्हीन देवनी परिक्षा का बरं दखतस?
11 नही! तर मंग जसं आपलं तसं त्यासनं बी प्रभु येशुना कृपातीन तारण व्हयेल
शे, असा आपला ईश्वास शे.”

12 तवय सर्व लोके गप्पच राहीनात, मंग बर्णबा अनी पौल यासनी
आपलाकडतीन देवनी गैरयहूदी लोकसमा ज्या ज्या चिन्ह अनी चमत्कार करात
यानाबद्दलनं सर्व वर्णन त्यासनी ऐकी लिधं.
13 मंग त्यासनं भाषण संपानंतर याकोब बोलना; भाऊसवन, मनं ऐका!
14 गैरयहूदी लोकसमाईन आपला नावकरता लोकसले निवाडी लेवानं म्हणीसन
पहिले देवनी त्यासनी भेट कशी लिधी, हाई शिमोननी आत्तेच समजाडीन सांगेल
शे;
15 अनी त्यासनासंगे संदेष्टासना युक्तीना बी मेळ बठस, अस शास्त्रमा लिखेल शे
की,
16 यानंतर मी परत येसु,
अनी दावीदनं पडेल राज्य परत उभं करसु,
अनी त्यानी मोडतोड,
परत उभारीसन निट करसु.
17 यानाकरता की उरेल मनुष्यसनी अनी ज्या गैरयहूदीसले मनं नाव देयल शे,
त्या सर्वासनी प्रभुना शोध कराना.
18 हाई जे त्याले युगना पहिला पाईन माहीत शे ते करनारा प्रभु अस म्हणस.✡

---

✡ **15:7** १५:७ प्रेषित १०:१-४३ ✡ **15:8** १५:८ प्रेषित १०:४४; २:४ ✡ **15:18** १५:१८ आमोस
९:११-१२

19 यामुये मनं मत अस शे की, ज्या गैरयहूदीसमातीन देवकडे वळतस त्यासले
तरास देवु नका.
20 तर त्यासले अस पत्र लिखीन धाडानं की, त्यासनी ते जेवण खावाले नको जे
अशुध्द शे, कारण ते मुर्तिसले चढायेल शे अनी व्यभिचारपाईन दुर रावा अनी गळा
दाबीन मारेल कोणताच प्राणीनं मांस, रक्त हाई खावानं नही.
21 कारण जुना काळपाईन शब्बाथ दिनले सभास्थानमा मोशेनं पुस्तक वाचीन
त्याना प्रचार करनारा लोके प्रत्येक नगरसमा शेतस.

### गैरयहूदी ख्रिस्ती लोकसले एक पत्र

22 तवय सर्व मंडळीसह प्रेषितसनी अनी वडील लोकसनी हाई ठरायं की,
पौल अनी बर्णबा यासनासंगे आपलामातीन निवडेल आदरणीय माणसे त्या म्हणजे
बंधुवर्गमधला प्रमुख बर्शब्बा म्हणेत तो यहुदा अनं सीला यासले अंत्युखियाले धाडं.
23 त्यासनासंगे त्यासनी अस पत्र लिखी धाडं की;

"अंत्युखिया, सिरिया अनी किलिकिया आठला गैरयहूदीसमधला भाऊसले
प्रेषित अनी वडीलवर्ग या भाऊसना सलाम;

24 आमनापैकी कितलातरी जणसनी जाईन आपला बोलीघाई तुमले नाराज
करीसन तरास दिधा, अस आमना कानवर येल शे; पण आम्हीन त्यासले अशी
आज्ञा देयल नव्हती.
25 यामुये आमनं एकमत व्हवानंतर आमले हाई योग्य दखायनं की, आपला
प्रिय भाऊ बर्णबा अनी पौल यासनासंगे तुमनाकडे काही माणससले निवाडीन धाडानं
26 ह्या असा लोके शेतस ज्या आपला प्रभु येशु ख्रिस्तना नावकरता आपला
जीव देवाले तयार राहतस.
27 यानाकरता यहुदा अनी सीला यासले आम्हीन धाडेल शे, ज्या गोष्टी
आम्हीन लिखीन धाडेल शेतस त्या गोष्टी तुमले तोंडेतोंड सांगतीन.
28 पुढला ज्या नियम शेतस त्यासना तुमनावर जास्त भार देवाले नको अस
पवित्र आत्माले अनी आमले योग्य वाटनं.
29 म्हणजे मुर्तिले अर्पण करेल पदार्थ, रक्त, गळा दाबीन मारेल प्राणी अनी
व्यभिचार करनं यापाईन स्वतःले संभाळशात तर तुमनं बरं व्हई; कल्याण असो."

30 मंग त्यासले धाडं अनी त्या अंत्युखियाले गयात तठे त्यासनी सर्व मंडळीले
जमाडीन ते पत्र सादर करं.
31 ते मोठा आवाजतीन वाचीन त्यामाईन मिळेल बोधमुये त्यासले भलताच
आनंद व्हयना.

32 यहुदा अनी सीला ह्या संदेष्टा व्हतात म्हणीसन त्यासनी बी बरचस प्रोत्साहन
दिसन बंधुजनसले बोध करा अनी त्या ईश्वासमा स्थिर व्हयनात.
33 त्या काही दिन तठे र्‍हावानंतर ज्यासनी त्यासले धाडेल व्हतं त्यासनाकडे
जावाकरता बंधुजनसनी त्यासनी शांतीमा रवानगी करी.
34 पण सीलानी तठे राहावानं ठराई लिधं.*
35 पौल अनी बर्णबा बाकीना बराच जणससंगे प्रभुनं वचन शिकाडत अनी
शुभवर्तमान गाजाडात अंत्युखिया गावमा राहीनात.

### पौल अनी बर्णबा येगळा व्हतस

36 मंग काही दिन नंतर पौलनी बर्णबाले सांगं, “ज्या ज्या शहरसमा आपण प्रभुनं
वचन गाजाडं तठे परत जाईसन भाऊ अनी बहीणीसले भेटीन त्या कसा शेतस हाई
दखुत.”
37 बर्णबानी ईच्छा व्हती की, ज्याले मार्क म्हणतस त्या योहानले संगे लेवानं.
38 ✡पण पौलले वाटनं की, पंफुल्या गावपाईन जो आपले सोडीन निंघी गया
अनी आपलासंगे कामवर वना नहीं त्याले संगे लेनं योग्य नही.
39 हाई बात वरतीन त्यासनामा मतभेद व्हईसन संतापमा त्या एकमेकसपाईन
येगळा व्हयनात, अनी बर्णबा मार्कले लिसन नावमा बठीन सायप्रस गावले गया.
40 पौलनी सीलाले निवडी लिधं अनी बंधुजनसनी त्याले प्रभुनी कृपावर सोडी
दिधं, मंग तो तठेन निंघना.
41 पुढे मंडळ्यासले ईश्वासमा स्थिर करीसन सिरिया अनी किलिकिया या
गावसमातीन तो गया.

# 16

### तिमथ्य पौलले भेटस

1 मंग पौल दर्बे अनी लुस्त्रमा बी वना, तठे तिमथ्य नावना कोणतरी एक शिष्य
व्हता, त्यानी माय यहूदी ईश्वासी बाई व्हती, त्याना बाप हेल्लेणी* व्हता.
2 तो लुस्त्र अनी इकुनियो गावना ईश्वासु लोकसमा नावाजेल होता.

* **15:34 15:34** पण सीलानी तठे राहावानं ठराई लिधं. सर्व शास्त्रलेखात हाई वचन सापडस नही
✡ **15:38** १५:३८ प्रेषित १३:१३ * **16:1 16:1** हेल्लेणी ग्रीक

3 त्यानी आपलासंगे येवानं अशी पौलनी ईच्छा व्हती; तवय तठे ज्या यहूदी
व्हतात त्यासनामुये त्यानी त्याले लिसन त्यानी सुंता करी; कारण त्याना बाप
गैरयहूदी व्हता हाई सर्वासले माहीत व्हतं.
4 तवय त्यासनी गावसमातीन जाता जाता यरूशलेममाधील मंडळीना प्रेषित अनी
वडीलवर्ग यासनी ज्या नियम ठराई देयल व्हतात त्या त्यासले पाळाकरता नेमी
दिधात.
5 यामुये मंडळ्या ईश्वासमा स्थिर व्हयनात अनी त्यासनी संख्या वाढत गयी.

## त्रोवासा गावमा पौलले दृष्टांत व्हस

6 नंतर आशिया देशमा वचन सांगाकरता त्यासले पवित्र आत्माकडतीन अडथळा
व्हयना त्यामुये त्या फ्रुगिया अनी गलतिया ह्या प्रांतसमातीन गयात.
7 अनी मुसिया प्रदेशनी सिमापावत येवावर बिथुनियास प्रांतमा जावाना त्यासनी
प्रयत्न करा; पण येशुना आत्मानी त्यासले जावु दिधं नही.
8 मंग त्या मुसियाजवळतीन जाईन त्रोवासा गावले गयात.
9 तठे रातले पौलले असा दृष्टांत व्हयना की; कोणी तरी मासेदोनिया प्रदेशना
माणुस उभा राहीसन आपले ईनंती करीसन म्हणी राहीना की, "ईकडे मासेदोनिया
ईसन आमले मदत कर!"
10 असा त्याले दृष्टांत व्हवानंतर त्या लोकसले शुभवर्तमान सांगाले देवनी आपले
बलायेल शे असा अंदाज करीसन आम्हीन मासेदोनिया प्रदेशले जावाना लगेच ईचार
करा.

## पौल मासेदोनियामधला फिलीप्पै शहरले जास

11 तवय त्रोवासा गावतीन नावमा बठीन आम्हीन निट वाट धरीन समथ्राके गावले
गवुत अनी दुसरा दिन नियापुलीस गावले गवुत.
12 तठेन फिलीप्पैले गवुत, ते मासेदोनिया पहिला प्रदेशनं शहर व्हतं, तठे रोमी
लोकसनी वस्ती व्हती; त्या शहरमा आम्हीन काही दिनपावत राहीनुत.
13 मंग शब्बाथ दिनले आम्हीन शहरना वेशीबाहेरनी नदीकाठले, जठे प्रार्थना
व्हस अस आमले वाटनं तठे जाईन बठनुत अनी ज्या बाया तठे जमेल व्हत्यात त्या
त्यासनासंगे बोलु लागणात.
14 तवय थुवतीरा शहरनी लुदिया नावनी कोणी एक बाई जांभळा कपडा ईकनारी
देशभक्तीन व्हती, तिनी आमनं भाषण ऐकं; तिना अंतःकरण देवनी अस प्रफुल्लीत
करा की पौलना बोलनाकडे तिनी निट लक्ष दिधं.

15 मंग लुदियाना आपला कुटुंबसंगे बाप्तिस्मा व्हवानंतर तिनी अशी ईनंती करी
की, “मी प्रभुवर ईश्वास ठेवणारी शे अस जर तुम्हीन ठरायेल शे तर मना घर ईसन
राहा.” हाई ईनंती तिनी आग्रह करीसन आमनाकडतीन मान्य करी लिधी.

## पौल अनी सीला कैदखानामा

16 मंग अस व्हयनं की, एक दिन आम्हीन प्रार्थना स्थळकडे जाई राहींतुत तवय
दुष्ट आत्मा आंगमा व्हतात अशी एक दासी जी जवान पोर आमले दखायनी; ती
दैवीप्रश्न सांगीन तिना मालकले बराच पैसा कमाडीन देत ऱ्हाये.
17 ती पौलना अनी आमनामांगे ईसन जोरमा बोलनी, “ह्या माणसे परात्पर देवना
दास शेतस! ह्या तुमले तारणना मार्ग सांगतस!”
18 अशी ती बराच दिनपावत करत राहीनी, मंग पौल भलताच अस्वस्थ व्हईसन
मांगे फिरना अनी त्या दुष्ट आत्माले बोलना, “येशु ख्रिस्तना नावतीन मी तुले आज्ञा
करस की, तु हिनामाईन निंघी जाय!” अनी तो आत्मा लगेच निंघी गया.
19 मंग आपली कमाडानं साधन गयं अस दखीन तिना मालकनी पौल अनी
सीला यासले वढत अधिकारीसकडे चौकमा लई गया.
20 अनी त्यानी त्यासले रोमी अधिकारीसपुढे उभं करीसन सांगं, “या माणसे
यहूदी राहीसन आमना शहरना लोकसले भलताच तरास देतस,
21 अनी आम्हीन रोमी लोकसले ज्या परीपाठ स्विकाराले अनी आचरण कराले
योग्य नहीत त्या ह्या सांगतस.”
22 तवय लोकसनी गर्दी पौल अनं सीलावर ऊठनी, अनी अधिकारीसनी
त्यासना कपडा फाडीन त्यासले फटका मारानी आज्ञा दिधी.
23 मंग त्यासले बराचसा फटका मारानंतर कैदखानामा टाकी दिधं अनी त्यासले
कडक बंदोबस्तमा ठेवानं असा कैदखानाना अधिकारीले हुकूम करा.
24 असा त्याले हुकूम मिळानंतर त्यानी त्यासले मधला कैदखानामा टाकीन
त्यासना पाय लाकुडना ओंडकामा आटकाडात.
25 जवळजवळ मध्य रातले पौल अनी सीला ह्या देवले प्रार्थना करी राहींतात
अनी गाना म्हणी राहींतात तवय पहेरेदार त्यासनं ऐकी राहींतात.
26 तवय अचानक असा मोठा भूकंप व्हयना की कैदखानाना पाया डगमगना;
सर्व दारे लगेच उघडनात अनी सर्व कैदीसना साखळबंद सुटी गयात.

27 तवय कैदखानाना अधिकारीनी झोपमाईन जागा व्हईसन कैदखानाना दारे
उघडा दखात अनी कैदी पळना व्हतीन अस समजीसन तलवार काढीन तो स्वतःना
घात करणार व्हता.
28 ईतलामा पौल जोरमा वरडीन बोलना, “तु स्वतःनं काय करी लेवु नको,
कारण आम्हीन सर्व आठेच शेतस!”

29 मंग दिवा लाईन तो अधिकारी मझार धावत गया अनी कापत कापत पौल
अनी सीला यासन्या पाया पडना.
30 अनी त्यासले बाहेर काढीन बोलना, “महाराज, मनं तारण व्हवाले पाहिजे
म्हणीसन मी काय कराले पाहिजे?”

31 त्या बोलनात, “प्रभु येशुवर ईश्वास ठेव, म्हणजे तुनं अनी तुना घराणानं तारण
व्हई.”
32 त्यासनी त्याले अनी त्याना घरमातील सर्वासले प्रभुनं वचन सांगं.
33 मंग रातनी तीच येळले त्यानी त्यासन्या जखमा धुयात अनी तवय त्यानी
अनी त्याना घरना सर्वासनी बाप्तिस्मा लिधा.
34 मंग त्यानी त्यासले घर लई जाईसन जेवण दिधं अनी देववर ईश्वास ठिसन
सर्व कुटूंबसंगे आनंद करा.

35 दिन उगानंतर रोमी अधिकारीसनी शिपाईसले सांगीन धाडं की, “त्या
माणससले सोडी द्या.”

36 तवय कैदखानाना अधिकारीनी पौलले अस वर्तमान सांगं की, “तुमले सोडाव
म्हणीसन अधिकारीसनी माणसे धाडेल शेतस, तर आते शांततामा निंघी जा.”

37 तवय पौल त्याले बोलना, “आम्हीन रोमी माणसे व्हतुत अनी अपराधी ठरनुत
नही तरी त्यासनी आमले लोकसना समोर फटका मारीन कैदखानामा टाकं अनी
आते त्या आमले गुपचुप धाडी राहीनात का? अस नही; तर त्यासनी स्वतः ईसन
आमले बाहेर लई जावं.”

38 मंग शिपाई अधिकारीनी हाई बातमी रोमी अधिकारीसले सांगी, तवय त्या
रोमी शेतस, अस ऐकीसन त्यासले भिती वाटनी.
39 मंग त्यासनी ईसन त्यानी समजुत करी अनी त्यासले बाहेर आणीन
शहरमातीन निंघी जावानी ईनंती करी.
40 मंग पौल अनी सिला कैदखानामातीन निंघीन लुदियाना घर गयात, ईश्वासु
बंधुवर्गाले भेटीन त्यासनी त्यासनं समाधान करं, अनी तठेन त्या वाटले लागनात.

# 17

## थेस्सलनीका शहरमा पौल अनी सीला

1 नंतर पौल अनी सीला अंफिपुलीस अनी अपुल्लोनिया यासनामातीन जाईन
थेस्सलनीका शहरले गयात, तठे यहूदीसनं सभास्थान व्हतं.
2 तठे पौलनी आपला कायमनी पध्दतप्रमाणे सभास्थानमा जाईसन शास्त्रवरतीन
तीन शब्बाथ दिनसले त्यासनासंगे संवाद करा.
3 त्यानी नियमशास्त्रना उलगडा करीसन स्पष्टीकरण करं की, ख्रिस्तनी दुःख
सोसावं अनी मरेलस मातीन परत जिवत व्हणं हाई आवश्यकच व्हतं अनी ज्या
येशुबद्दल मी तुमले सांगस तोच ख्रिस्त शे.
4 तवय त्यासनामातीन बराच जण अनी ग्रीक भक्तीमान लोकसनी मोठी गर्दी
अनी बऱ्याच ज्या मुख्य बाया व्हत्यात त्यासनी खात्री पटीन त्या पौल अनी सीला
यासनामा ईसन मिसळण्यात.
5 पण यहूदी लोकसनी हेवा करीसन आपलाकडे काही बजारमाधला
रिकामटासले लिसन अनी गर्दी जमाडीन शहरमा बंगावा करा; अनी यासोना नावना
माणुसना घरवर हल्ला करीसन पौल अनी सीलाले लोकसकडे बाहेर काढीन आणानं
प्रयत्न करा.
6 पण त्यासना शोध लागना नही, तवय त्यासनी यासोनले अनं बराच
ईश्वासु बंधुसले शहरना अधिकारीसकडे ओढत ली जाईसन आरडाओरड करीसन
बोलनात, "ज्यासनी सर्वीकडे उलटपलट करी, त्या आठे येल शेतस."
7 त्यासले यासोननी आपला घरमा ठेयल शे अनी या सर्व कैसर राजाना हुकूमना
विरोधमा वागतस, म्हणजे येशु नावना कोणतरी एक दुसरा राजा शे अस म्हणतस.
8 हाई ऐकाडीन त्यासनी लोकसले अनी शहरना अधिकारीसले कावरबावरा
करी सोडं.
9 मंग त्यासनी यासोनले अनी बाकीनासले पैसा लिसन सोडी दिधं.

## बिरूया शहरमा पौल अनी सीला

10 यामुये ईश्वासु लोकसनी पौल अनी सीला यासले लगेच रातोरात बिरूयाले
धाडी दिधं; त्या तठे पोहचनात तवय यहूदीसना सभास्थानमा गयात.
11 तठला लोके थेस्सलनी शहरना लोकसपेक्षा मोठा मनना व्हतात, त्यासनी
मोठी आतुरतातीन देवना वचनना स्विकार करा अनी पौलनी सांगेल या गोष्टी असाच
शेतस का याना रोज त्या शास्त्रमा शोध करत गयात.

12 यावरतीन तठला बराच जणसनी अनी रोमी मुख्य ज्या बाया व्हत्यात त्यासनी
अनी माणससमातील बराच जणसनी ईश्वास धरा.
13 पौल देवनं वचन बिरूया शहरमा बी सांगी राहीना शे, हाई थेस्सलनी
शहरमाधला यहूदीसले समजनं तवय त्यासनी तिकडे बी जाईसन लोकसले
चिंगाडीन खवळाई दिधं.
14 त्यावरतीन ईश्वासी भाऊसनी पौलले समुद्रकडे लगेच धाडं, पण सीला अनी
तिमथ्य हाई तठेच राहिनात.
15 तवय पौलले पोहचाडणारासनी त्याले अथनै शहरपावत लई गयात, सीला
अनी तिमथ्य यासनी मनाकडे जितलं लवकर व्हई तितलं लवकर यावं अशी पौलनी
आज्ञा मानीसन त्या निंघनात.

### अथेनै शहरमा पौल

16 पौल अथेनैस शहरमा सीला अनी तिमथ्य यासनी वाट दखी राहींता तठे ते
शहर पुरं आत्माघाई भरेल दखीसन तो भलताच नाराज व्हयेल व्हता.
17 यामुये तो सभास्थानमा यहूदीससंगे, देवनी भक्ती करेत असा गैरयहूदी
लोकससंगे अनी बजारमा ज्या भेटेत त्यासनासंगे तो रोज वाद करे.
18 तवय *एपिकुर पंथना अनी स्तोयिक पंथना बराच तत्त्वज्ञानी लोके त्याले
आडवा वनात, त्यासनामातीन काहीजण बोलनात, “हाऊ अज्ञानी काय बोलस?”
तर दुसरा काहीजण बोलनात, “हाऊ परका देवनी वार्ता सांगणारा दखास” कारण
तो त्यासले येशु अनी पुनरूत्थान यानाबद्दल सुवार्ता सांगे.
19 नंतर त्यासनी पौलले धरीसन अरीयपगानी सभामा म्हणजे शहरनी सभामा
लई जाईन सांगं, “तु हाई देयल नवं शिक्षण काय शे ते आमले समजाडशी का?”
20 कारण तु आमले ज्या गोष्टी माहीत नही त्या ऐकाडी राहीना, त्या काय शेतस
ते आमले समजाले पाहिजे, अशी आमनी ईच्छा शे.
21 सर्व अथेनैसकर अनं तठे राहनारा बाहेरगावना लोके यासले काही
नविनविशेष सांगनं किंवा ऐकानं यानाशिवाय आपला रिकामा येळ दुसरा कसामाच
घालता ये नही.
22 तवय पौल अरीयपगानी सभाना मझारमा उभा राहीसन बोलना, अहो,
अथेनैसकरसवन, तुम्हीन देवदेवतासले भलताच माणनारा शेतस, अस माले
दखायनं.

---

* **17:18 17:18** एपिकुर पंथ अनी स्तोयिक पंथ, ह्या निसर्गनी पुजा करनारा लोके (पंथ) व्हतात

23 कसावरतीन, कारण मी शहरमा फिरता फिरता तुमनी भक्ती करणाऱ्या जागा
दख्यात, त्यामा माहीत नही असा देवले बी काही अक्षर लिखेल वेदी माले दखायनी,
त्यानी भक्ती तुम्हीन करतस त्या देवबद्दल मी तुमले घोषणा करस,
24 ✡ज्या देवनी जग अनी त्यामाधलं सर्वकाही बनाडं तो आकाशना अनी
पृथ्वीना प्रभु शे, म्हणीसन तो हातसघाई बनाडेल मंदिरसमा राहस नही,
25 अनी त्याले काय उणं शे, म्हणीसन माणुसना हाततीन त्यानी सेवा व्हवाले
पाहिजे अस नही, तर जिवन, प्राण अनी सर्वकाही तोच सर्वासले देस;
26 अनी एक माणुसपाईन त्यानी सर्व लोकसले उत्पन्न करीसन, त्यासनी सर्व
पृथ्वीवर राहवाले पाहिजे, अस त्यानी करं, अनी त्यासले नेमेल येळ अनी त्यासनी
वस्तीसन्या सीमा त्यानी ठरायेल शेतस.
27 हाई यानाकरता की, लोकसनी देवना शोध कराले पाहिजे, म्हणजे त्यानापावत
जाईसन त्याले कसतरी शोधी लेवानं, तो आपलामाधला कोणताच माणुसपाईन दुर
नही शे.
28 कारण कोणतरी सांगेल शे की, आपण त्यानामा जगतस, वागतस अनी शेतस.
तसच तुमनामाधला बराच कवीसनी म्हणेल शे की,
आपण त्याना वंश शेतस.
29 तर आपण दैवी वंश राहिसन, आमले हाई वाटाले नको की, देव सोनं, चांदी
किंवा दगडमा कोरेल आकृतीनामायक शे जे मनुष्यनी कला अनी कल्पना करीसन
बनाडेल शे.
30 देवनी बराच काळमा दखं की, लोकसनी त्याले वळख नही, पण आते
सर्वासनी सर्वीकडे पश्चाताप कराना, अशी तो मनुष्यले आज्ञा करस.
31 त्यानी एक दिन असा नेमी ठेयल शे की, त्या दिन आपण नेमेल माणुसनाद्वारा
तो जगना न्यायनिवाडा सत्यतातीन करी ली, ज्यानी त्याले मरेलस मातीन जिवत
करीसन याबद्दल सर्वासले प्रमाण पटाडी देयल शे!
32 तवय मरेलसनं परत जिवत व्हनं हाई ऐकीसन काही जणसनी थट्टा करी, पण
काहीजण पौलले बोलनात, "यानाबद्दल आम्हीन तुनं आखो परत ऐकसुत."
33 इतलं व्हवानंतर पौल त्यासनामातीन निंघी गया.
34 तरी त्यानासंगे राहीसन कितलातरी लोकसनी ईश्वास धरा, त्यामा
अरीयपगीय गावना दिओनुस्य अनी कोणतरी दामारी नावनी बाई अनी त्यासनासंगे
बाकीना बराच व्हतात.

✡ **17:24** १७:२४ प्रेषित ७:४८

# 18

## करिंथ शहरमा पौल

1 त्यानानंतर पौल अथेनैस सोडीसन करिंथ शहरले गया.
2 तवय पंत गावना कोणतरी अक्विला नावना यहूदी त्याले दिसना, कारण सर्व
यहूदीसनी रोम शहर सोडीन जावानं अशी क्लौदिया नावना राजानी आदेश करामुये
तो नुकताच इटलीतीन त्यानी बायको प्रिस्किल्ला हिनासंगे येल व्हता, त्यासनाकडे
तो गया.
3 त्यासना अनी पौलना धंदा एकच व्हता म्हणीसन तो त्यासनाकडे राहीना अनी
तठे त्यानी तो धंदा चालाडा; त्याना धंदा तंबु बनाडाना व्हता.
4 तो प्रत्येक शब्बाथ दिनले सभास्थानमा वाद करीसन यहूदीसनी अनी ग्रीक
गैरयहूदी लोकसनी समजुत घाले.
5 जवय सीला अनी तिमथ्य या मासेदोनियातीन वनात तवय येशु हाऊच ख्रिस्त
शे अशी साक्ष यहूदी लोकसले दिसन वचन सांगामा पौलनी पुरा येल दिधा.
6 अनी जवय त्या त्याले अडाईन अपशब्द बोलु लागनात तवय त्यानी आपला
कपडा झटकीसन त्यासले सांगं, तुमनं रंगत तुमना माथावर*, मी निर्दोष शे,
आतेपाईन मी गैरयहूदी लोकसकडे जासु.
7 मंग तठेन निंघीसन सभास्थानना जोडे ज्यानं घर व्हतं असा कोणतरी तिता
युस्त नावना गैरयहूदी देवभक्त व्हता त्याना घर तो गया.
8 तवय सभास्थानना अधिकारी क्रिस्प यानी आपला सर्व घराणासंगे प्रभुवर
ईश्वास ठेवा अनी बराच करिंथकरसनी संदेश ऐकीसन ईश्वास ठेवा अनी बाप्तिस्मा
लिधा.
9 तवय प्रभुनी रातले पौलले दृष्टांत दिसन सांगं, “भ्याऊ नको, बोलत जाय, उगा
राहु नको,
10 मी तुनासंगे शे, तुनं वाईट कराले कोणी तुनावर येवाव नही, कारण या शहरमा
मना बराच लोके शेतस.”
11 तो त्यासनामा दिड वरीस देवनं वचन शिकाडत राहीना.
12 नंतर गल्लियो हाऊ अखया प्रांतना रोमी राज्यपाल बनना तवय यहूदी लोके
एकजुट करीसन पौलवर ऊठनात अनी त्याले न्यायसभापुढे लई वनात,

* **18:6 18:6** तुमनं रंगत तुमना माथावर, मी निर्दोष शे तुमना पापामुये तुमना आत्माना नाश व्हई, ह्यानाकरता मी जबाबदार नही शे

13 अनी बोलु लागनात “हाऊ माणुस, आमना नियमशास्त्रना विरूध्द देवनी
उपासना कराकरता लोकसले भडकावस.”
14 तवय पौल तोंड उघडीन बोलणारच व्हता इतलामा गल्लियो यानी यहूदीसले
सांगं, “अहो, यहूदीसवन, हाई प्रकरण गैरशिस्त वर्तननं किंवा दुष्ट कामनं र्‍हातं, तर
माले तुमनं म्हणनं मनवर लेवानं कारण व्हई जातं,
15 पण हाऊ वाद शब्दसना, नावसना किंवा तुमना नियमशास्त्रना शे, तर तुमनं
तुम्हीनच दखा, असा गोष्टीसना माले न्यायनिवाडा करना नही शे!”
16 अस बोलीन त्यानी त्यासले न्यायसभामातीन हाकली दिधं.
17 तवय सर्वासनी सभाना अध्यक्ष सोस्थनेस याले धरीन न्यायसभासमोरच मार
दिधा, पण गल्लियोनी यापैकी कोणतीच गोष्टीसनी पर्वा करी नही.

## पौल सिरिया देशमा परत येस

18 †यानानंतर पौल तठे बराच दिन राहवानंतर ईश्वासु बंधुसना निरोप लिसन
जहाजमा बठीन सिरिया देशले गया; त्यानासंगे प्रिस्किल्ला अनी अक्विला या बी
गयात, त्याना नवस व्हता म्हणीसन त्यानी क्रिंख्रिया शहरमा आपला डोकाना केस
कापात.
19 मंग इफिस शहरमा येवावर त्यानी प्रिस्किल्ला अनी अक्विलाले तठे सोडं
अनी स्वतः सभास्थानमा जाईसन यहूदी लोकससंगे संवाद करा.
20 नंतर त्यानी आखो थोडा दिन तठे राहाव अशी त्या ईनंती करी राहींतात तवय
त्यानी त्यासनं ऐकं नही.
21 तवय त्यासना निरोप लेवावर, “देवनी ईच्छा व्हई तर मी तुमनाकडे परत
फिरीन ईसु” अस बोलीन इफिसतीन जहाजमा बठीन तो निंघना.
22 मंग कैसरियाले पोहचानंतर तो वर यरूशलेमले गया अनी मंडळीले भेटीसन
परत खाल अंत्युखिया गावमा गया.
23 तठे काही दिन राहीसन तो निंघना, अनी गलतिया प्रांत अनी फ्रुगिया प्रांत
यामाधला सर्व शिष्यसले ईश्वासमा स्थिर करत फिरना.

## इफिस अनी करिंथ शहरमा अपुल्लो

24 तवय अपुल्लो नावना मोठा वक्ता अनी शास्त्रसंपन्न असा एक आलेक्सांद्रिया
गावना हाऊ यहूदी व्हता, तो इफिसले वना.

† **18:18 18:18** गणना 6:18 दखा

25 त्याले प्रभुना मार्गबद्दलनं शिक्षण भेटेल व्हतं अनी तो पवित्र आत्मातीन भरेल
व्हता म्हणीसन येशुबद्दल गोष्टी नीट सांगीसन शिक्षण देत राहे, पण त्याले योहानना
बाप्तिस्माबद्दल माहीत नव्हतं.
26 तो सभास्थानमा बिनधास्त बोलु लागना, तवय प्रिस्किल्ला अनी अक्विला
यासनी त्यानं ऐकीसन त्याले जोडे लिधं, अनी देवना मार्ग त्याले चांगलाच स्पष्ट
दखाडा.
27 नंतर अपुल्लोनी अखया प्रांतमा जावाना बेत करा तवय इफिसुसना ईश्वासु
बंधुवर्गनी त्याले हिम्मत दिधी अनी त्यानं स्वागत कराकरता शिष्यसले लिखं; तो
तठे पोहचावर ज्यासनी देवना कृपामुये ईश्वास धरा व्हता त्यासले त्यानी भलतीच
मदत करी.
28 कारण येशु हाऊच ख्रिस्त शे, अस त्यानी शास्त्रवरतीन दखाडीन मोठा
सामर्थ्यतीन सर्वासना समोर यहूदीसनं तोंड बंद करं व्हतं.

# 19

## इफिस शहरमा पौल

1 मंग अस व्हयनं की अपुल्लो करिंथ शहरमा व्हता तवय पौल वरला प्रांतमातीन
जाईन इफिसले पोहचना, तठे कितलातरी शिष्य त्याले दखायनात.
2 त्यासले तो बोलना, "तुम्हीन ईश्वास धरा तवय तुमले पवित्र आत्मा भेटना
का?"
त्यासनी त्याले सांगं, "पवित्र आत्मा शे अस आम्हीन ऐकेल सुध्दा नही."
3 तो त्यासले बोलना, "तर मंग तुम्हीन कसाना बाप्तिस्मा लिधा?"
त्या बोलनात, "योहानना बाप्तिस्मा."
4 ✡पौलनी सांगं, "योहान पापसपाईन फिराना बाप्तिस्मा दे, तो लोकसले सांगे
की, मना मांगतीन येणारावर म्हणजे येशुवर तुम्हीन ईश्वास ठेवाना."
5 हाई ऐकीसन त्यासनी प्रभु येशुना नावतीन बाप्तिस्मा लिधा.
6 अनी पौलनी त्यासनावर हात ठेवा अनी पवित्र आत्मा त्यासनावर वना, त्या
येगयेगळी भाषा बोलु लागनात अनी देवना संदेश देवु लागनात.
7 त्या सर्व जवळजवळ बारा माणसे व्हतात.
8 नंतर पौल यहूदी सभास्थानमा जाईन देवन्या राज्यन्या गोष्टीसबद्दल संवाद करत
अनी प्रमाण पटाडत बिनधास्त तीन महीना बोलत गया.

✡ **19:4** १९:४ मत्तय ३:११; मार्क १:४,७,८; लूक ३:४,१६; योहान १:२६,२७

9 मंग कितलातरी जण कठोर अनी विरोधी व्हईसन लोकसना समोर त्या
देवमार्गनी निंदा करू लागनात; तवय त्यानी त्यासनामातीन निंघीन शिष्यसले बी
येगळं करं अनी तुरन्नाना शिक्षणगृहमा तो दररोज संवाद करू लागना.
10 अस दोन वरीस चालामुये आशिया प्रांतमा राहणारा सर्व यहूदी अनी गैरयहूदी
लोकसनी प्रभुनं वचन ऐकं.

## स्किवाना पोऱ्या

11 देवनी पौलना हाततीन असाधारण चमत्कार करी लिधात.
12 त्या असा की, रूमाल किंवा फडकं त्याना आंगवरतीन आणीन रोगीवर टाका
म्हणजे त्याना रोग बरा व्हई जाये अनी दुष्ट आत्मा व्हई तर तो बी निंघी जाये.
13 पण तवय काही यहूदी लोके दुष्ट आत्मा लागेल लोकसवर प्रभु येशुना नावना
उपयोग करीसन दुष्ट आत्माले बोलु लागनात "ज्या येशुनी पौल सुवार्ता सांगस त्यानी
मी तुमले शपथ घालस."
14 अस करनारा माणसे एक यहूदी मुख्य याजक स्किवा याना सात पोऱ्या
व्हतात.
15 त्यासले दुष्ट आत्मानी उत्तर दिधं, "मी येशुले अनी पौलले बी वळखस, पण
तुम्हीन कोण शेतस?"
16 मंग ज्या माणुसले दुष्ट आत्मा लागेल व्हता त्यानी त्यासनावर उडी मारीन
हमला करा, अनी त्यासनावर त्या इतला भारी पडनात की, त्या उघडानागडा अनी
जखमी व्हईसन त्या घरमातीन पळी गयात.
17 तवय इफिसमा राहनारा यहूदी अनी गैरयहूदी या सर्वासले हाई माहीत व्हयनं
तवय त्यासले भिती वाटनी अनी प्रभु येशुना नावना महिमा व्हयना.
18 ईश्वास ठेवणारा लोकसपैकी बराच जणसनी आपला पापं कबुल करीसन त्या
उघडा करात.
19 जादु करनारामाधला बराच लोकसनी आपला पुस्तके जमा करीसन
सर्वाससमोर जाळी टाकात, अनी त्यासना किम्मतनी बेरीज करी तर ती पन्नास
हजार रूपया व्हयनी.
20 अस प्रभुनं वचन सामर्थ्यतीन वाढत जाईसन भक्कम व्हयनं.

## इफिसमा चळवळ

21 हाई व्हवानंतर मासेदोनिया अनी अखया या प्रांतमातीन यरूशलेम शहरले
जावानं अस पौलनी आपला मनमा निश्चय करा अनी बोलना, “तठे जावानंतर
माले रोम शहर बी दखाले पाहिजे.”
22 मंग आपली सेवामा मदत करनारासपैकी तीमथ्य अनी एरास्त या दोन्हीसले
मासेदोनिया धाडीन तो स्वतः काही दिन आशिया प्रांतमा राहीना.

23 त्या येळले इफिस शहरमा देवना त्या मार्गबद्दल बरीच चळवळ व्हयनी.
24 कारण की देमेत्रिय नावना कोणतरी एक सोनार अर्तमी नावनी देवीनं चांदीनं
देव्हारं करीसन कारागीरसले बराच कामधंदा लाई दि राहींता.
25 त्यानी त्यासले अनी दुसरा बाकीना कारागीरसले जमाडीन सांगं,
“भाऊसवन, हाऊ धंदामुये आपले पैसा भेटस हाई तुमले माहीत शे.
26 तुम्हीन दखतस अनी ऐकतस की इफिस शहरमाच नही तर जवळजवळ सर्व
आशिया प्रांतमा, हातघाई बनाडेल मुर्ति देव नहीत, अस हाई पौलनी बोलीन अनी
बराच लोकसले समजाडीसन त्यासले फिताडेल शे.
27 यामुये हाई आपला धंदाकरता धोकादायक शे; इतलंच नही तर, जी महादेवी
अर्तमीनी भक्ती सर्व आशिया अनी जग बी करस तिनं देऊळ लोके तुच्छ मानतीन
अनी तिले कोणीच महत्व देवाव नही, अशी भिती वाटस!”

28 हाई ऐकानंतर त्यासले भलताच राग वना अनी त्या वरडू लागनात की,
“इफिसकरसनी अर्तमी देवी थोर शे!”
29 इतलामा शहरमा धांदल उडनी अनी पौलना सोबती ज्या व्हतात त्या
मासेदोनियाना गायस अनं अरिस्तार्ख या दोन्हीसले पकडीसन वढत वढत त्यासले
नाटकगृहमा लई गयात.
30 तवय ती गर्दीमा जावानं अस पौलना मनमा व्हतं, पण शिष्यसनी त्याले जावु
दिधं नही.
31 प्रांतना अधिकारीसपैकी बराच त्याना मित्र व्हतात, त्यासनी त्याले ईनंती
करीसन निरोप धाडा की, नाटकगृहमा जाईसन स्वतःले धोकामा टाकु नको.
32 तवय कोणी काय, कोणी काय, असा आरोळ्या मारी राहींतात, लोकसना
एकच गोंधळ व्हयना अनी आपण कसाले जमनुत हाई बराच जणसले समजनं नही.
33 मंग अलेक्सांद्र नावना यहूदी माणुसले लोकसनी पुढे ढकलावर बराच
जणसनी त्याले गर्दीमातीन बाहेर ओढीन काढं, तवय अलेक्सांद्र हातघाई इशारा
करीसन लोकसनी समजुत घाली राहींता.

34 पण तो यहूदी शे, अस समजानंतर जवळजवळ दोन तासपावत,
“इफिसकरसनी अर्तमी थोर!” असा सर्वासना एकच आवाज व्हता.
35 मंग शहरना लिपीक लोकसले शांत करीसन बोलना, “अहो इफिसकरसवन!
हाई कोणले माहित नही की, इफिस शहर महान अर्तमी देवी अनी ज्युपितर देव या
स्वर्गमातीन पडेल दगडनी रक्षा करनारा शेतस.
36 या गोष्टीसले अमान्य करनारा कोणीच नही शे म्हणीसन तुम्हीन शांत राहा,
काहीच उतावळापणा करू नका.
37 कारण ज्या माणससले तुम्हीन आठे आनेल शे, त्या देवालय लुटनारा किंवा
आपला देवसनी निंदा करनारा लोके नहीत.
38 यामुये देमेत्रिय अनी त्याना सोबतीसना यासना कोणसंगे काही वाद व्हई तर,
न्यायगृह उघडा शेतस अनी न्यायाधीश बी शेतस, त्यासनापुढे त्यासनी एकमेकसवर
आरोप ठेवाना.
39 पण दुसरी एखादी गोष्टनी मागणी व्हई तर तिनाबद्दल कायदेशीर सभामा
ठरावामा ई.
40 या दंगानं कारण काय ह्याना जबाब तुमले देता ई नही राहीना त्यामुये आजनी
या घटनामुये तुमनावर बंड कराना आरोप व्हवानी येळ येवु शकस.”
41 अस बोलीन त्यासनी सभा रद्द करी टाकी.

# 20

